# प्रेसनोट

दिनांक– ०५/१०/२०१८.

## सहायक कामगार आयुक्त कार्यालय, भिवंडी येथील सुविधाकारास लाच स्विकारताना अटक

दिनांक ०५/१०/२०१८ रोजी, सहायक कामगार आयुक्त कार्यालय, भिवंडी तसेच अतिरीक्त कार्यभार मिरा–भाईदर, जिल्हा ठाणे येथील सुविधाकार **'राज रामजी राजगुरू'**, वय ३४ यांना यातील तक्रारदार यांच्याकडून १०,०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांच्या पत्नीच्या नावे असलेल्या मॅटरनिटी हॉस्पीटलवर नोटीस काढुन त्यावर कारवाई न करण्याकरीता वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे १५,०००/–रुपये लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती १०,०००/–रुपये देण्याचे ठरले. सदरबाबत तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे तक्रार नोंदवली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन अेसीबी, ठाणे युनिटने सापळयाचे आयोजन करुन लोकसेवक **राज रामजी राजगुरू** यांना तक्रारदार यांच्याकडून १०,०००/– रुपयांची लाच स्विकारताना मिरा भाईदर येथील कार्यालयात रंगेहात पकडण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास श्री. लक्ष्मण राठोड, पोलीस निरीक्षक, अेसीबी, ठाणे हे करत असुन त्यांचा संपर्क क्र. ८१०८७४०००१ असा आहे.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979**
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner